# प्रकरण चौथे

## मराठीचा अध्यापक आणि छात्र

४.१ प्रास्ताविक

४.२ मराठीच्या अध्यापकाकडे आवश्यक असलेले गुण

- ४.२.१ विषयाची आवड
- ४.२.२ व्यासंग
- ४.२.३ प्रभुत्व
- ४.२.४ इतर भाषांशी परिचय
- ४.२.५ अध्यापनतंत्राचे ज्ञान
- ४.२.६ व्यक्तिमत्व

४.३ मराठीच्या छात्राकडे आवश्यक असलेले गुण

४.४ समारोप.

## ४.१ प्रास्ताविक :

प्रकरण तीनमध्ये विविध पाठप्रकार आणि मराठीच्या अध्यापनपध्दती यांचा विचार करण्यात आला. या अध्यापनपध्दतींचे सखोल आणि सविस्तर ज्ञान अध्यापनास असावेच लागते. प्रस्तुत संशोधनाची सैध्दांतिक पार्श्वभूमी म्हणून मराठीच्या विविध अध्यापनपध्दतींचा विचार उपयुक्त ठरतो. या पध्दतींचा वापर कुशलतेने केल्यास अध्यापन प्रभावी होते. तेव्हा या पध्दतींचा वापर करणारा अध्यापक विचारात घ्यावा लागतो. मराठीचा अध्यापक तर विशेष क्षमतांनी, गुणांनी युक्त असावा लागतो. या संबंधीचे विवेचन प्रस्तुत संशोधनासाठी पार्श्वभूमी म्हणून करणे महत्त्वाचे ठरते. तसेच मराठीचा छात्र कसा असावा, त्याच्याजवळ कोणते गुण अपेक्षित आहेत याचाही विचार या प्रकरणात केलेला आहे. कारण ज्याला शिकवायचे त्याच्याजवळसुध्दा काही गुण अपेक्षिले जातात. अध्यापक आणि छात्र यांचे गुण अध्यापन-अध्ययन प्रभावी तसेच यशस्वी करतात. हे गुण परस्परांना पोषक ठरतात. म्हणून दोहोंचाही विचार करणे इष्ट ठरते.

## ४.२ मराठीच्या अध्यापकाकडे आवश्यक असलेले गुण :

मराठीचा अध्यापक मराठी शिकविण्यास पात्र तेव्हाच असतो जेव्हा त्यास मराठीची खरीखुरी अंतरीची आवड असते. त्याचा मराठीचा व्यासंग सातत्यपूर्ण असावा लागतो. त्याचे मराठीवर प्रभुत्व असणे आवश्यक मानले जाते. त्याचा इतर भाषाभगिनींशी परिचय असावा लागतो. त्याला अध्यापनतंत्राचे ज्ञान असावे लागते. त्याचे व्यक्तिमत्व प्रभावी असावे लागते.

वर उल्लेख केलेल्या गुणसमुच्चयांपैकी एक एक गुणांचा विशेष विचार करण्यात आलेला आहे.

४.२.१ विषयाची आवड :

मराठी विषयाच्या शिक्षकाचा मराठीकडे नैसर्गिक कल असावा. आवडीवर अध्यापनाचे यशापयश अवलंबून असते. हे मराठीच्या शिक्षकाबाबतही योग्य ठरते. आवडीशिवाय तन्मयता नाही, पारंगतता नाही. विद्यार्थ्यांवर अनुकूल परिणाम नाही आणि व्यासंग नाही. मराठीबद्दल विद्यार्थी दशेपासून ही आवड असणे उत्तमच आहे. विद्यार्थीदशेत जर वाचनाची गोडी लागलेली असेल तर ती अधिक प्रभावी ठरते. विद्यार्थी दशेतील ही वाचनाची सवय मनावर वेगळा ठसा उमटविते. त्यावेळी मिळालेले अनुभव पुढे शिकविणाऱ्या त्या अवस्थेच्या विद्यार्थ्यांना साहाय्यभूत होतात.

४.२.२ व्यासंग :

मराठीचे सतत वाचन ठेवून मराठी विषयाबाबत सतत ताजेपणा राखण्यासाठी आवड महत्त्वाची आहे. पण व्यासंग सतत असणे हेही महत्त्वाचे आहे. विद्यार्थीदशेतील व्यासंग अपुरा असतो. ' पेशा शिक्षकांचा वृत्ती विद्यार्थ्याची ' हे मराठीच्या अध्यापकांनी सतत लक्षात ठेवायला लागते. वाचनाकडे अध्यापक दुर्लक्ष करतात. या विधानाची सत्यता मराठीच्या शिक्षकांच्या बाबतीतही पटत रहाते. केवळ मराठी विषयात पदवीधर वा पदव्युत्तर परीक्षेत उत्तीर्ण होऊन भागणार नाही. पूर्वीच्या वाचनाचा उपयोग होईलही पण वाड्.मयाचा प्रांत विशाल असल्याने आणि सर्वसंग्राहक असल्याने विविध प्रकारचे पाठ शिकविताना विविध प्रकारचे वाड्.मय वाचून अध्यापन तयारी, संदर्भ म्हणून करणे व्यासंगाशिवाय जमत नाही. साहित्याचे सूक्ष्म ज्ञान असल्याशिवाय साहित्यातील प्रवाह, साहित्याचे विविध कालखंडातील बदलते स्वरूप, साहित्यिकांनी घातलेली वाड्.मयात भर याबाबत ज्ञान येणार नाही. यासाठी व्यासंग आवश्यक आहे. निरनिराळ्या लेखकांचे, कवींचे (प्राचीन अर्वाचीन), साहित्यकृतींचे परिशीलन होण्यासाठी

व्यासंगाची गरज आहे. लेखकांच्या अनुभूती त्यांच्या ग्रंथात असल्याने त्या ग्रंथांचे वाचन अध्यापनास साहाय्यभूत ठरते. लेखकांच्या अनुभूती विद्यार्थ्यांपर्यन्त पोहचविण्याच्या बाबतीत मराठीचा शिक्षक हा दुभाषी आहे. त्या अनुभूती अगोदर नीट समजून घेतल्याशिवाय समजावून देणे शक्य होणार नाही आणि या अनुभूती प्रथम आस्वादण्यासाठी व्यासंगाची आवश्यकता आहे. वाचन हा मराठीच्या शिक्षकांचा उपकारक छंद असावा. केवळ शालेय पुस्तक वाचणे हे तुटपुंजे असते. मराठीचे पुस्तक म्हणजे ओझरते दर्शन म्हणावे लागते. स्वत: वाचल्याशिवाय काय वाचावे वा काय वाचू नये याबाबतीत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे मराठीच्या अध्यापकांना शक्य होणार नाही. मराठीत चांगली वाचनीय पुस्तके कोणती हे स्वत: वाचल्यानंतर सांगता येईल. विद्यार्थ्यांना वाचनाची प्रेरणा मराठीच्या अध्यापकांनी देणे हे महत्त्वाचे असते हे जर सत्य असेल तर मराठीचा अध्यापक वाचनप्रिय असायला हवा. नवे जुने चांगले साहित्य वाचणे अध्यापनास पोषक होते. भाषेच्या कल्पनाविलासाच्या आणि विचारसौंदर्याच्या दृष्टीने जे जे आढळेल ते ते मराठीच्या शिक्षकांनी नित्य टिपले पाहिजे.

४.२.३ <u>भाषाप्रभुत्व</u> :

मराठी भाषेवर मराठीच्या अभ्यासकाचे प्रभुत्व हवे. हे प्रभुत्व एक मोठे हत्यार आहे. वाचन, भाषण, लेखन या मराठी भाषेच्या विविध स्वरूपावर मराठी शिक्षकाचे प्रभुत्व हवे. अभ्यासाने मराठी भाषेवर प्रभुत्व संपादन करता येते. विद्यार्थ्यांच्या बौध्दिक दर्जानुसार त्यांच्याशी हसत खेळत संभाषण करता येणे ही कला, प्रभुत्वाचे निदर्शक आहे. अस्खलित, सावकाश आणि उच्चार स्पष्ट करून बोलणे ही सवय मराठी शिक्षकांनी आत्मसात केली पाहिजे. त्यांच्या बोलण्यात डौलदारपणा, वजनदारपणा, शुध्दता असली पाहिजे. त्यांची भाषण-शैली योग्य रितीने संपादलेली हवी. प्रकट वाचन अर्थपूर्ण करता आले पाहिजे. त्यांना ललित वाङ्मय लिहिता आले पाहिजे असा आग्रह धरता येत नाही तरी ते जे

लिहितील ते शुध्द भाषेत व शुध्दलेखनाच्या नियमानुसार असावे. हे बरोबर का ? व हे चूक का ? याचे शास्त्रीय ज्ञान मराठीच्या शिक्षकांना असावे. प्रभुत्व संपादन करीत असताना मराठीच्या अध्यापकांनी वरील बाबी जाणाव्या लागतात.

४.९.४ इतर भाषांशी परिचय :

मातृभाषेच्या शिक्षकांचा इंग्रजी, हिंदी, संस्कृत आदी भाषांशी परिचय असणे आवश्यक आहे. व्याकरण, वाक्यरचना, वाङ्‌मय या तिन्हीबाबत वरील तीन भाषांचे तौलनिक ज्ञान मराठी शिक्षकांनी आत्मसात केले तर मराठीच्या उत्कृष्ट अध्यापनास ते साहाय्यभूत ठरेल. संस्कृतचे ज्ञान असलेला मराठीचा अध्यापक पाया चांगला मजबूत करेल. केवळ मातृभाषेचा म्हणजे मराठीचा दुराभिमान आणि संकुचित वृत्ती असलेला अध्यापक दुसऱ्या भाषेतील चांगले घेऊन आपली मायभाषा समृध्द करू शकणार नाही. मराठीच्या परीक्षांना विद्यार्थी तयार करण्यासाठी मराठीच्या शिक्षकांनी कार्य केले तर हेच विद्यार्थी मायभाषेची सेवा करण्यास सक्षम होतील. मराठीच्या शिक्षकांनी उत्तमोत्तम साहित्य कृती, संमेलने, परिसंवाद याबाबतीत पुढाकार घेतला तर तो प्रयत्न मराठीच्या अध्यापनास साहाय्यभूत होईल, उपयुक्त होईल.

४.२.५ अध्यापनतंत्राचे ज्ञान :

मराठीच्या अध्यापकास अध्यापनतंत्राचे ज्ञान हवे. अध्यापनाचे शास्त्रीय नियम तसेच अध्यापनाची कला यांचे ज्ञान मराठीच्या अध्यापनाच्या संदर्भात मराठी अध्यापकास हवे. इतरांचे मराठीचे पाठ निरीक्षण करून तो आपल्या पाठात सुधारणा करू शकेल यासाठी गुणग्राहकता आवश्यक आहे. परिस्थिती, वातावरणा-प्रमाणे, विद्यार्थ्यांप्रमाणे, आशयाप्रमाणे, तंत्रबदल करण्याइतका लवचिकपणा असेल तर मराठीचे अध्यापक कल्पकतापूर्वक, योजनापूर्वक, कौशल्यपूर्वक मराठीचे अध्यापन करू शकतील.

४.१.६ व्यक्तिमत्व :

मराठीच्या शिक्षकाचे व्यक्तिमत्व प्रभावी हवे. शिक्षकांचे आचार, विचार, यांची छाप विद्यार्थ्यांवर पडते. मराठीबद्दल अंत:करणपूर्वक जिव्हाळा, अभिमान असलेले मराठीचे अध्यापक कधीही अध्यापन निष्काळजीपूर्वक करणार नाहीत असे शिक्षक आपल्या आवडीनिवडी, विशिष्ट लेखकाबद्दलचे पूर्वग्रह विद्यार्थ्यांवर लादू इच्छित नसतात.

मराठीच्या अध्यापकांनी आपल्या अंत:करणात भाषेच्या शुध्द स्वरूपाबद्दल, सद्रूपाबद्दल अभिमान जागृत ठेवला आणि स्वत: कटाक्षाने शुध्द भाषा वापरली तर विद्यार्थी त्यांचे आदर्श अनुकरण करतील. जागृत असा मराठीचा अध्यापक मराठीबाबत कधीच कोणतीही चूक सहन करणार नाही यासाठी मराठी भाषेबद्दल प्रेम, उमाळा, पोटतिडीक मात्र अवश्य असायला हवी.

४.२ मराठीच्या छात्राकडे आवश्यक असलेले गुण :

मराठी विषयाचे ज्ञान घेऊन इच्छिणाऱ्या छात्रांनी प्रथम या विषयाची आपणास मनापासून मुळात आवड आहे का हे जाणून घेतले पाहिजे. केवळ इतरांना ती भाषा आवडते म्हणून आपण मराठीचा अभ्यास करावा हे योग्य नाही. मराठीबद्दल मुळात रुची आणि कल असेल तर मराठीच्या अध्ययनाबद्दल त्याच्या मनात जिज्ञासा, उत्कंठा निर्माण होईल. मराठी भाषेचा विशेष अभ्यास करताना आणि इतर अभ्यासूंना याबाबतीत मदत करताना ही आवड मुळात असावी लागते.

केवळ उपयुक्तता म्हणून मराठी न स्वीकारता, मराठी भाषेबद्दल प्रेम कळकळ, अभिमान, सेवावृत्ती आणि तिच्या उत्कर्षाची इच्छा असणारे छात्र कधीही मराठी भाषेचा अपूर्ण अभ्यास करणार नाहीत, आई इतकेच महत्त्व ते मराठीस देतील, या स्नेहापोटी ते मराठी भाषेचे श्रध्देने अध्ययन करतील आणि अन्य इच्छुकांना याबाबतीत मदत करतील.

मराठी भाषेचे स्वत्व ते डागाळू देणार नाहीत. स्वत: ते मराठी भाषेची निंदा करून तिला बदनाम करणार नाहीत वा इतरांना तिची बदनामी करू देणार नाहीत. निरपेक्ष वृत्तीने ते मराठीचे तहहयात अध्ययन करतील. मराठी भाषेबद्दलचे आपले कार्य ते बोलबाला न करता अखंड करतील. इतर भाषांचे सहकार्य घेऊन आपल्या भाषेतील उत्तम दुस-या भाषांना देतील. दुस-या भाषेतील उत्तम, घेऊन मराठी अधिक समृध्द करतील. याच स्नेहापोटी ते शुध्द मराठीचा आग्रह धरतील. स्वत: तिचे शुध्दत्व प्रथम राखतील. मराठी भाषेचा प्रसार आणि मराठी भाषेतील खरे ज्ञान सर्व मराठी भाषिकांपर्यन्त पोहोचविण्यासाठी कल्पक उपक्रम सतत यशस्वी करण्याचा प्रयत्न करतील.

मराठीच्या छात्राकडून सर्वसंग्राहकवृत्तीची आणि रसिकवृत्तीची अपेक्षा केली तर गैर ठरणार नाही. साहित्य सम्मेलनांची माहिती, लेखकांची व त्यांच्या साहित्यकृतींची माहिती संग्रहित करण्याची तसेच त्यांची चित्रे संग्रहित करण्याची आवड असली तर ती मराठीच्या अध्ययनास साहाय्यभूत ठरेल. मराठी भाषेचे समग्र रूपदर्शन घडविणा-या स्थळांना भेटी देऊन माहिती घेणे, साहित्यिकांच्या मुलाखती घेणे वगैरे उपक्रम जिज्ञासा, रसिकता, कल्पकता, सर्वसंग्राहकता या गुणाशिवाय यशस्वी होणार नाहीत.

मराठीच्या शुध्द वापराबाबत इतरांकडून अपेक्षा करणारा मराठीचा अध्येता स्वत: प्रथम आदर्श असणार आहे. मराठीच्या अभिवृध्दीसाठी, उत्कर्षासाठी तसेच मराठीचा सर्वांगीण परिचय मराठी भाषिकांना तसेच इतर भाषिकांना करून देण्यासाठी तो स्वत: मराठीचे सर्वांगीण ज्ञान, सदैव विद्यार्थी वृत्तीने घेईल.

चटकन् योग्य उत्तर देणे, अवघड मुद्यांसाठी शंका विचारणे, कल्पना स्पष्ट करणे, आपल्या भावना मांडणे, कवींच्या अनुभूती समजणे वगैरे क्रियासाठी अध्येता हा सरावाने सक्षम बनलेला पाहिजे. आवश्यक ते बारकाव्यांचे संदर्भ देण्याची तत्परता मराठीच्या अध्येत्याजवळ हवी. मराठीचा वर्ग मराठीमय

करण्यासाठी आणि अनुरूप वातावरणाद्वारे अध्ययन करण्यासाठी तो आपली कल्पक रसिकता उपयोगात आणू शकतो.

मराठीच्या छात्रास वाचनाची आवड पाहिजे. मराठीतील पाठ्यपुस्तके तर तो वाचणारच शिवाय उत्तमोत्तम ग्रंथ, इतर पुस्तके वाचून त्यांचे सारांश टिपण्याची व भाषण, लेखन इत्यादी कौशल्ये भाषा स्वरूपाच्या सरावाच्या वेळी वापरण्याची उपयोजकता मराठीच्या छात्राजवळ हवी.

मराठीचे व्याकरण, मराठीतील साहित्य, मराठीतील साहित्याचा इतिहास यांचा जिज्ञासावृत्तीशिवाय आणि आपुलकीशिवाय तो अभ्यास करू शकणार नाही.

मराठीचा अभ्यास कसा करावा, गद्य पद्य वेच्यांतील मर्म कसे आकलन करावे, व्याकरण कसे शिकावे यासाठी अध्येत्याने आदर्श पाठ बारकाईने निरीक्षावेत, त्यांचे अध्ययन करावे व रोजच्या रोज जे काय शिकलो त्याचे चिंतन वा उजळणी करण्याची सवय त्याने आपल्या अंगी बाणविली पाहिजे. जे जे शिकलो, त्याचे उपयोजन करण्याची क्षमता अध्येत्याजवळ असायला हवी. शिकल्यामुळे जे भाषा-प्रभुत्व येते त्याच्या आधारे इतरांच्या लेखनातील भावसौंदर्य आणि विचारसंपदा आपल्या शब्दात सांगता येते, लिहिता येणे, तसेच स्वत:चे अंगीभूत लेखन वा कथनाद्वारे स्वत:ला काय वाटते ते प्रकट करता येणे, हे जमले पाहिजे.

मर्मज्ञता, रसग्राहकता, गुणापूजकता, मराठीचा स्नेहमय अभिमान, प्रगटीकरणाक्षमता, उपयोजकशीलता, जिज्ञासा, सराव, वाचनप्रियता, अध्ययन-शीलता, तत्पर चौकस वृत्तीचा, मराठीच्या अध्येत्याकडे उत्तम गुण-समुच्चय असला तरच त्याचे अध्ययन व्यापक आणि यशस्वी होईल.

४.४ समारोप :

प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये मराठीच्या अध्यापकाकडे तसेच छात्राकडे कोणते गुण अपेक्षित आहेत याचे विवेचन केलेले आहे. वर्गात मराठीच्या तासाला अध्यापन आणि अध्ययन या दोन्ही परस्परपोषक क्रिया पाठयांश अधिक सुलभ, सुगम, संस्मरणीय आणि आनंददायी करतात. दोघांचे चांगले गुण एकत्र प्रगटल्याने अध्यापन आणि अध्ययन अध्यापकास आणि छात्रास सुखद अनुभव देतात. असा हा संगम मराठी भाषेचे स्वरूप अधिकच आकर्षक आणि प्रगल्भ करील.